# बृहन्मुंबई महानगरपालिका

**अनुज्ञापन खाते, (अतिक्रमण निर्मुलन), (जी/उत्तर विभाग)**

क्र. सआजीउ/ओडी/ १५६ /अनु.(अति.निर्मु.) दि. ०३/१०/२०२५

## जाहिर सूचना

विषय : अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहीर सुचना.

सदर जाहिर सुचनेमार्फत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील असणाऱ्या इच्छुक धर्मदाय आयुक्त व बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोंदणीकृत असलेल्या स्थानिक अशासकीय संस्था, मंजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था इत्यादि संस्थांकडून प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यापासून (जे नंतर असेल) पुढील १२० दिवसाच्या कालावधीकरिता अतिक्रमण निर्मुलन वाहनावर एकूण २५ कंत्राटी कामगार पुरविण्याकरिता मोहरबंद इच्छापत्र मागविण्यात येत आहे.

सदर अर्जाचा नमुना वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मुलन) जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, तळ मजला, रूम नं. ७, हरिश्चंद्र येलवे मार्ग, जे.के. सावंत जोडरस्ता, दादर (प.), मुंबई – ४०० ०२८ येथे रु. ३,०००/- + १८% वस्तु व सेवा कर (GST) आकारून (ना परतावा) रोख स्वरुपात चलनाद्वारे दि. ०६.१०.२०२५ ते दि. १३.१०.२०२५ या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत विकत घेऊ शकता. तसेच आवश्यक कागदपत्रांसहित सिलबंद अर्ज दि. १३.१०.२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत अनुज्ञापन खाते, जी/उत्तर विभाग येथील सिलबंद पेटीत टाकावे. सुचनेमध्ये नमूद केलेल्या कालावधीनंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर कामासाठी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील संस्थांनी अर्ज करावेत.
२. प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यापासून (जे नंतर असेल) पुढील १२० दिवसाच्या कालावधीकरिता आवश्यकतेनुसार कामगार पुरविणे.
३. प्रति दिन प्रती कामगार रु. ७९२.३०/- इतके वेतन या दराने महानगरपालिकेच्या परिपत्रकानुसार अधिदान देण्यात येईल.
४. जी/उत्तर विभागातील अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार रोजच्या कामाकरिता मागणी केलेल्या (दिवस/दुपार/रात्र) सुरळीतपणे, विनाविलंब सक्षम कामगारांचा पुरवठा करणे.
५. पुरवठा केलेल्या कामगारांच्या बिलाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परिक्षणानंतर विभागीय लेखा सांकेतांक २२०८००४०० या लेखाशिर्षातून संबंधित संस्थेचा ई.सी.एस. / एन.ई.एफ.टी. द्वारे पुढील महिन्याच्या १५ तारखेनंतर अधिदान केले जाईल.
६. बाल कामगारांना पुरवठा करणे निषिदध आहे व तसे केल्यास त्याची संपुर्णत: कायदेशीर जबाबदारी संबंधित अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांची राहील.
७. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांनी नोंदवणी प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशील, मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
८. वरील अटींचे पालन न करणाऱ्या व समाधाकारकरित्या काम न करणाऱ्या अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचेकडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरीत थांबविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर विभाग यांना राहतील.
९. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचेकडून विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून लॉटरी पद्धतीने पात्र अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांची निवड करण्यात येईल.

वरील निकषामध्ये न बसणाऱ्या संस्थांना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

लॉटरीची तारीख १३.१०.२०२५ रोजी दुपारी ४:०० वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

सही/-

सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग